# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:29.07.2024** **वार:सोमवार**

1. भारताची महिला नेमबाज मनु भाकरने रचला इतिहास, पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत कास्यपदक पटकावलं.
2. खादी आणि हातमाग उत्पादनांच्या वाढत्या मागणीमुळे रोजगाराच्या अनेक संधी, जास्तीत जास्त खादी उत्पादने वापरण्याचं पंतप्रधानांचं मन की बात मधून आवाहन.
3. 75 व्या वर्धापन दिनानिमित्त सर्वोच्च न्यायालयातर्फे, आजपासून विशेष 'लोकअदालत सप्ताहाचं' आयोजन
4. दिल्ली पालिकेनं जुन्या राजेंद्रनगर भागातील 13 शिकवणीवर्गांना टाळं ठोकलं, पुरामुळे झालेल्या मृत्युंची राष्ट्रीय महिला आयोगाकडून गंभीर दखल आणि
5. महिला टी-ट्वेंटी आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत श्रीलंका संघाला पहिल्यांदाच जेतेपद

**मनू भाकर-ऑलिंपिक**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत भारताची महिला नेमबाज मनु भाकर हिने ऐतिहासिक कामगिरी करत कास्यपदक पटकावलं आणि ऑलिंपिक स्पर्धेत भारताचं पदकांचं खातं उघडलं. 10 मीटर एअर पिस्टल प्रकारात 221 पूर्णांक 7 अंक मिळवत तिने हे पदक पटकावलं. नेमबाजी क्रीडा प्रकारात 12 वर्षानंतर भारताला हे पदक मिळालं आहे, तर, ऑलिंपिक स्पर्धेत नेमबाजीत पदक मिळवणारी ती पहिली भारतीय महिला खेळाडू ठरली आहे. तिच्या या ऐतिहासिक कामगिरीबद्दल देशभरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांनी मनू भाकरचं या कौतुकास्पद कामगिरीबद्दल अभिनंदन केलं आहे.

दरम्यान, भारतीय नेमबाज रमिता जिंदाल आणि अर्जुन बबुता अनुक्रमे महिलांच्या 10 मीटर एअर रायफल आणि पुरुषांच्या 10 मीटर एअर रायफल प्रकारात अंतिम फेरीसाठी पात्र ठरले आहेत. बॅडमिंटनमध्ये महिला एकेरीत, भारताच्या पीव्ही सिंधूने मालदीवच्या फातिमथ नबाहा अब्दुल रज्जाकवर 21-9, 21-6 असा सहज विजय मिळवून विजयी रुवात केली. तर, टेनिसमध्ये भारताच्या श्रीजा अकुला हिने काल महिला एकेरी स्पर्धेत स्वीडनच्या क्रिस्टीना कॉलबर्गवर विजय मिळवत पुढील फेरीत प्रवेश केला.

**मन की बात**

देशात खादी आणि हातमाग उत्पादनांना चांगली मागणी आहे. या उत्पादनांच्या वाढत्या विक्रीमुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आकाशवाणीवरुन काल प्रसारित झालेल्या एकशे बाराव्या 'मन की बात' कार्यक्रमात, देशाला संबोधित करताना ते बोलत होते. खादी ग्रामोद्योगाची उलाढाल प्रथमच दीड लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे, असं पंतप्रधान पुढे म्हणाले. अनेक जण आता खादी उत्पादनं अभिमानाने वापरत असून, ज्यांनी अजूनपर्यंत खादीची वस्त्रे परिधान केलेली नाहीत, त्यांनी या वर्षीपासून खादी उत्पादने खरेदी करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी यावेळी केलं.

हातमाग उद्योगाबद्दल बोलताना, पंतप्रधानांनी हरयाणातल्या रोहतक जिल्ह्यातील 'उन्नती' या स्वयंसहाय्यता गटाचं विशेष कौतुक केलं. या गटातील अडीचशे महिलांनी ब्लॉक प्रिंटिंग आणि डाईंगचे प्रशिक्षण घेतलं आणि हातमाग वस्त्रांना रंगांची

झळाळी मिळवून दिली. हातमागाच्या माध्यमातून या महिलांना  उत्तम आर्थिक प्राप्ती होत असून, त्यांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांना बाजारात मोठी मागणी आहे. येत्या 7 ऑगस्टला देशात राष्ट्रीय हातमाग दिवस साजरा करण्यात येणार असल्याचं त्यांनी पुढे सांगितलं. हातमाग उत्पादनांना लोकप्रियता मिळवून देण्यासाठी, हातमाग कारागिरांनी, 'माय प्रॉडक्ट-माय प्राइड' हा हॅशटॅग वापरुन आपली उत्पादने अपलोड करावीत असं आवाहन पंतप्रधानांनी यावेळी केलं.

हातमाग आणि इतर स्थानिक उत्पादनं लोकप्रिय करण्यासाठी देशभरातल्या महिलांच्या प्रयत्नांची त्यांनी यावेळी  माहिती दिली. यात त्यांनी महाराष्ट्राची पैठणी तसंच विदर्भातल्या हँड ब्लॉक प्रिंट या हातमाग उत्पादनांचाही उल्लेख केला. वाघ आणि मानवी संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी, तसंच वाघांच्या संरक्षणासाठी देशभरात सुरू असलेल्या प्रयत्नांची माहितीही त्यांनी दिली. याचं उदाहरण देताना त्यांनी राज्यातल्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचाही उल्लेख केला. देशाचा स्वातंत्र्यदिन अर्थात 15 ऑगस्ट जवळ येत आहे. या औचित्याने, 'हर घर तिरंगा' मोहिमेत सहभागी होण्याचं आवाहन पंतप्रधानांनी श्रोत्यांना 'मन की बात' मधून केलं. नागरिकांनी 'हर घर तिरंगा डॉट कॉम' या संकेतस्थळावर तिरंग्यासोबतचे सेल्फी अपलोड करावेत असं ते म्हणाले.

**<u>संसद</u>**

केंद्रीय अर्थसंकल्प 2024-25 वरील चर्चेला संसदेच्या दोन्ही सभागृहात आज पुन्हा सुरूवात होईल. 23 जुलैला अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावर सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांकडून विविध प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

**<u>भारत-सौदी अरेबिया</u>**

भारत आणि सौदी अरब या देशांनी, शुद्धीकरण, नवीकरणीय ऊर्जा आणि पेट्रोकेमिकल करखान्यांसाहित विविध क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय गुंतवणूक वाढण्याचा विचार केला आहे. उभय देशांमध्ये झालेल्या उच्चस्तरीय कार्यबलाच्या पहिल्या बैठकीत दोन्ही देशांना फायदेशीर होईल अशा पद्धतीने गुंतवणूक वाढवण्याच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. दुरदृश्य प्राणलीच्या माध्यमातून काल झालेल्या या बैठकीचं, पंतप्रधानांचे मुख्य सचिव पी. के. मिश्रा आणि सौदी अरबचे ऊर्जामंत्री प्रिन्स अब्दुलअजीज बिन सलमान बिन अब्दुलअजीज अल सौद यांनी संयुक्तपणे अध्यक्षपद भूषवलं.

**<u>जयशंकर-क्वाड</u>**

केंद्रीय परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर आज जपानमधील टोकियो इथे होत असलेल्या क्वाड देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. डॉक्टर जयशंकर यांचं दोन दिवसांच्या जपान दौऱ्यासाठी काल टोकियो इथे आगमन झालं. या बैठकीत ऑस्ट्रेलिया, भारत, जपान आणि अमेरिकेतील उच्चस्तरीय राजनैतिक अधिकारी एकत्र येणार असून आतापर्यंतच्या कामगिरीचा आढावा घेण्याची ही संधी आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.

**<u>लोक-अदालत</u>**

आपल्या 75 व्या वर्धापन दिनानिमित्त सर्वोच्च न्यायालयानं आजपासून विशेष 'लोक अदालत सप्ताहाचं' आयोजन केलं आहे. न्यायालयासमोरील  प्रलंबित प्रकरणे निकाली काढणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे, असं न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं. जास्तीत जास्त नागरिकांनी या लोक अदालतीचा लाभ घ्यावा, असं आवाहनही त्यांनी केलं. स्वेच्छेने आणि परस्पर संमतीने वाद सोडवण्याची संधी या उपक्रमाद्वारे मिळणार आहे असं ते पुढे म्हणाले.

**<u>कोचिंग-दिल्ली</u>**

दिल्ली महानगरपालिकेनं जुन्या राजेंद्रनगर भागातल्या 13 खासगी शिकवणी वर्गांना नियमांचं उल्लंघन केल्यानं टाळं ठोकलं आहे. याच भागातील एका स्पर्धा परीक्षेच्या खासगी शिकवणीच्या तळघरात अचानक पूर आल्यानं तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याच्या घटनेची दखल घेत हे पाऊल उचलण्यात आलं आहे. दरम्यान, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी दिल्लीच्या महापौर शेली ओबेरॉय यांच्या निवासस्थानाबाहेर काल निदर्शनं केली.

**नवी दिल्ली-विद्यार्थी आयोग**

दरम्यान, जुन्या राजेंद्र नगर भागातील शिकवणी वर्गाला जाणाऱ्या 2 महिलांसाहित 3 विद्यार्थिनींचा मृत्यू झाला होता. या घटनेची राष्ट्रीय महिला आयोगानं गंभीर दखल घेतली आहे. नाले स्वच्छतेच्या कामांमध्ये हलगर्जीपणा आणि दुर्लक्ष झाल्यामुळे हे मृत्यू झाल्याचं, आयोगाने समाज माध्यमांवरील संदेशात म्हंटलं आहे. या प्रकरणी येत्या 2 ऑगस्टला सुनावणी होणार असल्याचं आयोगानं जाहीर केलं आहे. याशिवाय राजेंद्रनगर विधानसभेचे आमदार दुर्गेश पाठक यांनाही आयोगानं नोटीस बजावली असून त्यांना प्रत्यक्ष हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. नोटीशीचं पालन न केल्यास योग्य ती कारवाई करण्यात येईल, असंही आयोगानं नमूद केलं आहे.

**शिक्षण-एनईपी**

शिक्षण मंत्रालय आज राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अंमलबजावणीचा चौथा वर्धापन दिन साजरा करत आहे. यानिमित्त नवी दिल्लीत, 'अखिल भारतीय शिक्षण संमेलन' या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते, विविध भारतीय भाषा शिकण्यासाठीच्या दूरचित्रवाणी वाहिनीसह, शिक्षण विभागाच्या अनेक महत्त्वाच्या उपक्रमांचं उद्घाटन यावेळी करण्यात येणार आहे.

**NTA-निकाल**

राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात, नॅशनल टेस्टिंग एजन्सी ने, CUET (UG) - 2024 चा निकाल जाहीर केला आहे. या परीक्षेला 14 लाख 99 हजार उमेदवारांनी नोंदणी केली होती. भारताबाहेरील 26 शहरांसह 379 शहरांमधील विविध केंद्रांवर, 15 ते 29 मे दरम्यान ही परीक्षा घेण्यात आली होती.

**अमरनाथ यात्रा**

अमरनाथ यात्रेसाठी एक हजार 832 यात्रेकरूंची आणखी एक तुकडी काल जम्मूमधल्या भगवतीनगर यात्री निवासमधून काश्मीर खोऱ्यातल्या तळ शिबिराच्या दिशेनं रवाना झाली. यातले 569 यात्रेकरू बालताल तळशिबिरासाठी आणि एक हजार 263 पहलगाम इथल्या तळ शिबिरासाठी काल पहाटे साडे तीनच्या सुमारास रवाना झाले तिथून ते अमरनाथगुहेच्या दिशेनं प्रवास करतील.

**क्रिकेट-भारत-श्रीलंका**

श्रीलंकेत पल्लीकल इथे झालेल्या पुरुषांच्या टी ट्वेंटी सामन्यात भारतानं श्रीलंकेचा 7 गडी राखून पराभव केला आणि तीन सामन्यांच्या मालिकेत 2-0 अशी विजयी आघाडी घेतली आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. श्रीलंकेनं निर्धारित 20 षटकांत 9 गडी गमावून 161 धावा केल्या. पावसामुळे आलेल्या व्यत्ययामुळे भारतीय संघाला 8 षटकांत 78 धावांचे लक्ष्य मिळालं. आज याच मैदानावर मालिकेतला अंतिम सामना खेळला जाणार आहे.

**महिला-क्रिकेट**

महिला आशिया चषक टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत काल दांबुला इथं झालेल्या अंतिम सामन्यात श्रीलंकेनं भारताचा 8 खेळाडू राखून पराभव करत पहिल्यांदाच आशिया चषक स्पर्धेचं अजिंक्यपद पटकावलं. नाणेफेक जिंकून, प्रथम फलंदाजीला उतरलेल्या भारतीय संघाने, निर्धारित 20 षटकांत 6 गडी बाद 165 धावा केल्या. 166 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेनं 18 षटकं आणि 4 चेंडूंमध्ये, दोन गडी गमावून 167 धावा केल्या. हर्षिता मडावीला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.